पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **२४/०२/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२४/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. गोफणे अनुराधा देविदास
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर

या शिवाय मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.डॉ.गडलिंगकर - वैद्यकीय अधिकारी, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १०/०२/२०१६ व १८/०२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २४/०२/२०१६ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०३/कावि/६२/२०१६, दि.०५/०२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्र.४५७ दि.२०/०१/२०१४ अन्वये मंजूर धोरणानुसार घटक योजना क्र.१५ परदेशातील उच्च शिक्षण घेणा-या युवतीस अर्थसहाय्य देणे ही योजना राबविण्यात येते. या योजने करीता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविणेत आले असता एकूण ७ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जाची अटीशर्तीनुसार तपासणी केली असता एकूण ५ अर्ज पात्र ठरले आहेत. सदर पात्र परदेशी उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणेकामी प्रत्येकी र.रु.१,००,०००/- या

प्रमाणे र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात " परदेशातील उच्च शिक्षण घेणा-या युवतीस अर्थसहाय्य " या उपलेखाशिर्षावर र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामधून सदरचा खर्च करणेत येईल. पात्र ठरलेल्या परदेशी उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणेकामी येणा-या र.रु. ५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) चे खर्चास तसेच ही योजना १२ ही महिने खुली असल्याने सन २०१५-१६ अखेर पर्यंत जेवढे अर्ज प्राप्त होतील त्या परदेशी उच्च शिक्षण घेणा-या युवतीस पात्र ठरणा-या लाभार्थींना अर्थ सहाय्य मंजूर करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२३/२०१६
दिनांक : २५/०२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.